नि.क्र. ७३ खाली.

**<u>तक्रारदारातर्फे दोषारोपा पुर्वी साक्षीदार .क्र. </u>३.**

**सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**

**नाव–** आप्पा नागोजी चौगुले.

**वय–** ७४ वर्षे, **व्यवसाय–** शेती,

**रा.–** मेंढोली, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**<u>तक्रारदारातर्फे श्री. ए. एस. फराकटे वकील यांच्या मार्फत–</u>**

**१.** मला या प्रकरणातील फिर्यादी व आरोपी माहिती आहेत. जनाबाईला आमच्या गावात दिलेली आहे. आरोपी क्र. १ तिचा सावत्र मुलगा असून आरोपी क्र. २ मुलगी आहे. आरोपी क्र. ३ दस्त लिहिण्याचे काम करतो. मी आरोपी क्र. ४ ते ६ यांना ओळखतो. जनाबाई व तिच्या मुलीने आरोपी क्र. १ प्रकाश व इतरांच्या विरोधात वाटणीचा दावा दाखल केला होता. तो आजदेखील प्रलंबित आहे.

**२.** घटना दि. ०१.११.२०१४ रोजी घडली होती. मला त्या दिवशी आरोपी क्र. ने वाटणीचा दावा मिटविण्याबाबत फोन करुन आनंदा कातकर याच्या घरी बोलाविले होते. मी दुपारी ०४.०० वाजता त्याच्या घरी गेलो होतो, त्यावेळी तेथे सर्व आरोपी टाटा सुमो गाडीने आलेले होते. त्यांनी आम्हाला वाटणीपत्र करुया आणि मिटवून घेऊया असे सांगितले होते. त्यांनी आम्हाला सोबत आणलेल्या टाटा सुमो गाडीत बसवून आज–याला आणले होते.

**३.** त्यांनी आम्हाला आरोपी क्र. ३ स्टॅंप रायटरकडे नेले होते. आरोपींनी अगोदरचा वाटणीपत्राचा मजकूर तयार करुन ठेवला होता. त्यावेळी आमच्या सोबत जनाबाई, तिची मुलगी आणि इतर पाच ते सहा लोक आले होते. आरोपींनी तेथे आल्यानंतर आम्हाला वाटणीपत्रावरती सहया करायला सांगितल्या होत्या, त्यांनी आम्हाला वाटणीपत्र वाचायला दिले नव्हते. त्यांनी आम्हाला तो कागद वाचून न दाखवता त्यावरती आमची स्वाक्षरी घेतली होती.

**४.** आरोपींनी आमच्या सहया घेतल्यानंतर मला बाहेर पाठवून दिले होते. त्यांनी जनाबाई व तिच्या मुलीला नेऊन वाटणीपत्राचा दस्त नोंदवून घेतला होता. आरोपींनी हक्कसोड पत्राचा दस्त करुन आम्हाला तो वाटणीपत्र दस्त असल्याचे सांगितले होते. आम्हाला त्याच संध्याकाळी सदर दस्त हक्कसोड पत्राचा असल्याचा समजल्यामुळे दुस–या दिवशी अर्ज दिला होता. त्यामुळे जनाबाईने आरोपीं विरोधात पोलिसांकडे तक्रार दिली होती. जनाबाई व मला

फसवणारे सर्व आरोपी न्यायालयात हजर आहेत. आरोपींनी माझी साक्षीदार म्हणून सही घेतली होती. त्यावेळी विठोबा घुरे देखील साक्षीदार म्हणून सही करण्यासाठी आलेला होता. त्याला जनाबाईने वाटणीच्या दाव्याचे मुखत्यारपत्र दिलेले होते. मी जनाबाईची भांडणे समजूतीने मिटत असल्यामुळे साक्षीदार म्हणून सही करण्यासाठी गेलो होतो.

**सरतपास पुर्ण**

**आरोपींतर्फे उलट तपास – श्री. जी. टी. ठाकूर वकील**

**५**. आरोपींतर्फे उलट तपास राखीव ठेवल्याबाबत पुरसीस दिल्यामुळे उलटतपास दोषारोप निश्चितीपर्यंत तहकूब ठेवण्याची विनंती केली.

**साक्षीदाराची सही.** समक्ष,

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक –२४.०९.२०२४. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.